सन २०१५-१६ च्या टंचाई कालावधीसाठी
पाचोरा शहराच्या तातडीच्या पाणी पुरवठा
योजनेस प्रशासकीय मान्यता देणेबाबत

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१५/प्र.क्र. २९२ /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीखः ४ जानेवारी, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय पा. पु. व स्व. वि. क्रमांकः टंचाई २००८/प्र.क्र. १४९/पापु १४, दिनांक २१.८.२००९
२) शासन पत्र, क्रमांक टंचाई २०१५/प्र.क्र. २९५/पापु १४, दिनांक १५.१२.२०१५ (बैठकीचे इतिवृत्त)
३) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे क्रमांक नपा/टंचाई/२(१)/पाचोरा जा. क्र. २९४६५/२०१५, दिनांक ४.१२.२०१५ चे पत्र व प्रस्ताव
४) जिल्हाधिकारी, जळगांव यांचे क्रमांक मशा/टंचाई २/७१५०/२६७८, दिनांक ३.१२.२०१५ चे पत्र व प्रस्ताव.

प्रस्तावना --

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सन २०१५-१६ च्या टंचाई कालावधीसाठी पाचोरा शहर तातडीच्या पाणी पुरवठा योजनेंतर्गत नगर परीषद पाचोरा, जिल्हा जळगांव येथे बहुळा मध्यम प्रकल्प येथून तातडीच्या पाणी पुरवठा योजनेच्या रु. ६,०८,०३,५८०/- रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव नागरी तथा ग्रामीण क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणीपुरवठा योजनांना/उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीच्या दिनांक १४.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

विभागीय आयुक्त नाशिक यांच्याकडून प्राप्त पाचोरा शहर तातडीच्या पाणी पुरवठा योजनेत नगरपरीषद पाचोरा, जिल्हा जळगांव येथील बहुळा मध्यम प्रकल्पातून तातडीच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत (१) टीन शेड (२) अशुध्द पाण्याची उर्ध्वनलिका ३०० एम.एम. डीआयए डीआयके-९ (३) पंपिंग मशिनरी इत्यादि बाबींचा समावेश असलेल्या एकुण रुपये ६,०८,०३,५८०/- रकमेचा प्रस्ताव

प्राप्त झाला होता. सदर प्रस्तावावर दि. १४.१२.२०१५ रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन स्थायी समितीने रु. ६,००,६४,१०३/- एवढ्या रकमेच्या प्रस्तावास मंजूरी दिली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय--

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी पाचोरा शहराच्या पाणी टंचाई निवारणार्थ पाचोरा, जिल्हा जळगांव येथील बहुळा मध्यम प्रकल्पातून तातडीच्या पाणी पुरवठा योजने अंतर्गत (१) टीन शेड (२) अशुध्द पाण्याची उर्ध्वनलिका ३०० एम.एम. डीआयए डीआयके-९ (३) पंपिंग मशिनरी इत्यादि बाबींचा समावेश असलेल्या एकुण रुपये ६,००,६४,१०३ (रुपये सहा कोटी चौसष्ट हजार एकशे तीन फक्त) किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक १४.१२.२०१५ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्यामुळे या आदेशान्वये सदर प्रस्तावास खालील अटींच्या अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे :-

१) जिल्हाधिकारी, जळगांव यांनी पाचोरा शहरात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली असल्याचे सर्व प्रथम घोषित करावे.

२) सदर योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणमार्फत करण्यात यावी.

३) सदर योजनेचे काम ४ महिन्याच्या आत तातडीने पूर्ण करावे.

४) सदर योजनेच्या एकूण रुपये ६,००,६४,१०३/- खर्चाच्या ९०% म्हणजेच रुपये ५,४०,५७,६९३/- इतके अनुदान शासनाद्वारे उपलब्ध करुन दिले जाईल. उर्वरीत रक्कम म्हणजेच योजनेच्या १०% रक्कम रुपये ६०,०६,४१०/- लोकवर्गणी म्हणून नगर परिषद, पाचोरा यांनी भरावयाची आहे. ही लोकवर्गणी जमा केल्यानंतरच योजनेच्या कामास सुरुवात करण्यात यावी.

५) विभागीय आयुक्त, नाशिक यांनी सदर योजनेकरिता योजनेच्या सुरुवातीस ५०% इतका निधी द्यावा. उर्वरित ५०% निधी योजना कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात यावा.

६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक २१.११.२०१५ अन्वये योजनेस तांत्रिक मान्यता दिली आहे. सदर तांत्रिक मान्यतेतील अटींची पुर्तता करण्यात यावी.

७) सदर तातडीच्या पाणी पुरवठा योजनेसाठी बहुळा धरणातून पाणी देण्यास तयार असल्याबाबत तसेच योजनेच्या आवश्यकतेनुसार योजनेचे पंप हाऊस तसेच टिन शेड बांधण्यास गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव यांचे संमतीपत्र मिळाल्यानंतरच योजनेची कामे सुरु करावीत.

८) योजनेतील पाईपलाईन साठी आवश्यक असणाऱ्या रस्ते व रेल्वे क्रॉसिंगची परवानगी नगरपरिषद, पाचोरा यांनी प्राप्त करुन घ्यावी.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी सचिवस्तरीय स्थायी समिती स्थापन केली असून सदर समितीच्या दिनांक १४.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०२१४४८४७८६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sawant Mahesh B

Digitally signed by Sawant Mahesh B
DN: CN = Sawant Mahesh B, C = IN, S = Maharashtra, O = Govt of Maharashtra, OU = Water Supply and Sanitation Department
Date: 2016.01.05 15:25:05 +05'30'

(म. भ. सावंत)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा व परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा व परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव, ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, नाशिक
९. जिल्हाधिकारी, जळगांव

१०.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण विभाग, नाशिक
११. मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१२.उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक पापु १४ (निवडनस्ती)